# BMM Oral Exam 2024 paper: Level 2

## वाचन आकलन

### अस्वल आणि दोन मित्र

एके दिवशी दोन मित्र जंगलातून चालले होते. वाटेत त्यांना एक अस्वल दिसले. त्याला पाहून त्यांच्यातला एक जवळच्या झाडावर चढला, पण दुसऱ्याला झाडावर चढता येत नव्हते. त्याला त्याच्या मित्राने मदत केली नाही. तो घाबरला नाही. त्याने एक युक्ती केली. तो जमिनीवर अगदी मेल्यासारखा पडून राहिला. अस्वल त्याच्याजवळ आले आणि त्याच्या कानाचा वास घेऊ लागले, पण तो जरा सुद्धा न हलल्यामुळे अस्वलाला वाटले, की तो मेला आहे, आणि ते निघून गेले. नंतर त्याचा झाडावरचा मित्र खाली आला आणि त्याने विचारले, “अस्वल तुला काय म्हणाले?” तेव्हा दुसरा मित्र म्हणाला, “अस्वलाने सांगितले , जो माणूस धोक्याच्या वेळी मदत करत नाही त्याच्याशी मैत्री करू नको".

खरा मित्र आपल्या मित्राला अडचणीत मदत करतो.

१. जंगलात मित्रांना काय दिसले ?

२. पहिल्या मित्राने काय युक्ती केली ?

३. दुसऱ्या मित्राने काय युक्ती केली?

४. ह्या गोष्टीतून आपण काय शिकलो?

# व्यायामाचे फायदे

चांगल्या आरोग्यासाठी व्यायाम हा खूप गरजेचा आहे, आणि आपले शरीर निरोगी ठेवण्याचा तो एक चांगला मार्ग आहे. नियमित व्यायाम केल्याने स्नायू,आणि  हाडांचे आरोग्य सुधारते. नियमित व्यायामामुळे रोग  होण्याचा आणि वजन वाढण्याचा धोका कमी होतो.  व्यायाम केल्याने मन निरोगी राहते आणि आपला आत्मविश्वास वाढतो. नियमित व्यायामामुळे हाडे मोडण्याची तीव्रता कमी होते. अशाप्रकारे व्यायामाचे अनेक फायदे आहेत. लहान मुलांपासून मोठ्या माणसां पर्यंत सगळ्यांनी रोज कमीत कमी वीस मिनिटं तरी व्यायाम केला पाहिजे. व्यायामासाठी जमलं तर एक वेळ ठरवली तर फारच छान. व्यायाम योगासने करून  घरी सुद्धा करता येतो.

१.  व्यायामाचे काय फायदे आहेत?

२. व्यायाम कोणी केला पाहिजे?

३. व्यायाम केव्हा आणि किती केला पाहिजे?

४. व्यायाम करायला जिमला जाव लागत का?

**श्रवण आकलन**

सिंहाच्या वेशात गाढव

---

एकदा एका गाढवाला सिंहाची कातडी सापडली. गाढवाने ती पांघरली, आणि ते थाटात फिरू लागलं. इतर प्राणी त्याला सिंह समजुन, तो दिसता क्षणी घाबरून दूर पळू लागले. गाढवाला मजा यायला लागली. आजवर कोणीही त्याला घाबरून पळाले नव्हतं. गाढव जंगलात सगळीकडे फिरून प्राण्यांना घाबरू लागले. फिरता फिरता गाढवाला एका कोपऱ्यात एक कोल्हा दिसला. गाढव त्याला घाबरवायला, त्याच्या जवळ जाऊ लागलं. कोल्ह्याने सावध पवित्रा घेतला आणि सिंहाच्या वेषातील गाढवाकडे रोखुन बघु लागला. गाढवाला कोल्ह्याची हिम्मत पाहुन राग आला, इतर सर्व प्राणी त्याला पाहताक्षणी पळत सुटले होते. कोल्हा तितका घाबरलेला दिसत नव्हता. गाढव कोल्ह्याला अजुन घाबरावे म्हणुन जोरात ओरडला. गाढवाचा आवाज ऐकता क्षणी, कोल्हा खो खो हसत सुटला. तो म्हणाला “अरे गाढवा, तू हा सिंहाचा वेष घेऊन आलास तर मी थोडा गोंधळलो होतो, मी, तु अजुन जवळ आला असता, तर घाबरून पळाले ही असतो. पण तु तोंड उघडलंस आणि तुझे खोटेपण तूच उघड केलस.”

१. ह्या गोष्टीतल्या गाढवाला काय सापडले?

२. सगळे प्राणी गाढवाला बघून का पळत होते?

३. गाढवाला का राग आला?

४. कोल्हा का हसु लागला?

५. तुम्हाला ह्या गोष्टीतुन काय कळलं?

# बापू

गांधी सकाळी लवकर उठत. देवाची प्रार्थना करत. खूप काम करत. ते दिवसभर कामात असत. गांधी झोपडीत राहत. ते दररोज सूत कातीत. स्वतः तयार केलेले कपडे वापरत. ते नेहमी स्वच्छ राहत. नेहमी खरे बोलत. गांधीजींना मुले फार आवडत. ते मुलांचे बापू होते. ते सर्वांचे बापू होते.

१. गांधी प्रार्थना केव्हा करत?

२. गांधीजी कामे केव्हा करत?

३. ते कसे राहत?

४. ते कुठे राहत?

५. मुले गांधीजींना काय म्हणत?

# गुढीपाडवा

भारत देशात दरवर्षी अनेक सण उत्सव साजरे केले जातात. त्याचप्रमाणे गुढीपाडवा हा महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जाणारा एक सण आहे.

गुढी पाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून, स्नान करून गुढी उभारण्यासाठी एका स्वच्छ काठीच्या टोकावर नवे व शुभ्र वस्त्र लावले जाते. या नव वस्त्रांवर झेंडूची फुले, कडूलिंबाचे पाने, आणि तांब्याचा लोटा लावला जातो. या नंतर या गुढीची पूजा करून तिला घराबाहेर उभे केले जाते. गुढीच्या अवतीभवती पाट ठेवून रांगोळी व इतर सजावट केली जाते. यानंतर दुपारी सूर्यास्तापूर्वी हळद-कुंकू लावून, अक्षता वाहून , पूजा करून , गुढी उतरवली जाते.

चैत्र महिन्यापासून हिवाळ्याची थंडी कमी होऊन उन्हाळा वाढायला लागतो. या वेळी कडुलिंबाची पाने खाल्ल्याने शरीरातील कीटकांचा नाश होतो. गुढी पाडव्याच्या सुमारास , झाडांना नवीन पालवी फुटते. गुढीपाडव्याला मराठी नवीन वर्ष सुद्धा म्हटले जाते.

१. महाराष्ट्रात कोणत्या सणाने नवीन वर्षाची सुरवात होते?

२. गुढी कशी उभारतात?

३. गुढी पाडव्याच्या दिवशी कुठली पाने खातात?

४. कडूलिंबाची पाने खाल्ल्याने काय होते?

# होळी

प्राचीन काळात एकदा हिरण्यकश्यपू नावाचा एक दुष्ट राजा होता. हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद हा भगवान विष्णूचा भक्त होता. प्रल्हादच्या विष्णु भक्तीला कंटाळून हिरण्यकश्यपूने त्याला मारून टाकण्याचा प्रयत्न केला. या कामात त्याने आपली बहिण होलिका ची मदत मागितली. होलिकाला आगीत न जाळण्याचे वरदान प्राप्त होते. होलिका प्रल्हाद ला धरून आगीत जाऊन बसली, परंतु विष्णुच्या कृपेमुळे भक्त प्रल्हाद आगीतून सुखरूप बाहेर पडला, पण होलिका त्या अग्निमध्ये जळाली. होळी ही वाईटावर चांगल्याचा विजय, असे मानले जाते. होळीचा सण दोन दिवसांचा असतो. यात पहिल्या दिवशी होळी जाळली जाते . होळीचा दुसरा दिवस धुलीवंदनाचा असतो. या दिवशी कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी एकमेकांना रंग लावून आनंद साजरा करतात.

१. होळीच्या सणात किती दिवस असतात ?

२. पहिल्या दिवशी काय करतात?

३. दुसऱ्या दिवशी काय करतात?

४. होळीच्या सणाची गोष्ट काय आहे?